धानावरील करपा, खोडकिडीच्या संकटावर आ. सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार; मुख्यमंत्र्यांचे तातडीने कार्यवाहीचे आदेश

नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत व मोफत औषधे देण्याची आ.मुनगंटीवार यांची मागणी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आ.मुनगंटीवार यांनी मांडली धान उत्पादकांची व्यथा; कृषी विभागाच्या प्रधान सचिवांना कार्यवाहीचे निर्देश

मुंबई : चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या उभ्या पिकावर खोडकिडी आणि करपा रोगाचे संकट गडद होत असताना आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा शासकीय निवासस्थानी भेट घेऊन शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले. धान पिकाच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, नुकसानग्रस्त पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी तसेच खोडकिडी व करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कृषी विभागामार्फत आवश्यक औषधे मोफत उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली. या मागणीची तात्काळ दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी विभागाच्या प्रधान सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

चंद्रपूर जिल्ह्यात खरीप हंगामातील धान पिकावर सध्या अनेक भागांत खोडकिडी तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे. ऐन हंगामात उभ्या पिकावर आलेल्या या संकटामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असून, मोठ्या खर्चातून आणि मेहनतीने उभे केलेले पीक हातचे जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे रोग-किडीचा प्रादुर्भाव वाढण्यापूर्वीच प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना प्रत्यक्ष भेट घेऊन दिलेल्या निवेदनातून खोडकिडी व करपा रोगामुळे बाधित झालेल्या धान पिकाची गावनिहाय प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने पंचनामे करण्याची मागणी केली. पंचनाम्याच्या आधारे नुकसानग्रस्त क्षेत्र निश्चित करून शासनाच्या प्रचलित निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना केली आहे.

यासोबतच,शेतकऱ्यांचे पुढील नुकसान टाळण्यासाठी केवळ पंचनामे करून न थांबता खोडकिडीच्या नियंत्रणासाठी आवश्यक कीटकनाशके आणि करपा रोगाच्या नियंत्रणासाठी आवश्यक बुरशीनाशके कृषी विभागामार्फत मोफत उपलब्ध करून देण्यात यावीत, अशी मागणीही आ.मुनगंटीवार यांनी केली. तसेच कृषी विभागाच्या पथकांनी गावागावांत आणि प्रत्यक्ष शेतांवर जाऊन पाहणी करावी, शेतकऱ्यांना औषधांचा योग्य वापर, फवारणीचे प्रमाण आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत तांत्रिक मार्गदर्शन करावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

धानाचे उत्पादन घटल्यानंतर मदत करण्यापेक्षा संकटाच्या सुरुवातीलाच शासनाने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांचे पीक वाचवणे अधिक महत्त्वाचे आहे, अशी भूमिका आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास वाचविण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नाची तातडीने दखल घेत कृषी विभागाच्या प्रधान सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाला शासनस्तरावर तातडीची गती मिळाली आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 8153/सप्टेंबर/२५

दिनांक : ०८.०९.२०२६

प्र.स-कृषी
कार्यवाही
करावी

प्रति,

मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई.

सप्रेम वंदेमातरम्...!!

विषय : चंद्रपूर जिल्ह्यातील धान पिकावर खोडकिडी व करपा रोगाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत व कृषी विभागामार्फत मोफत औषधे उपलब्ध करून देण्याबाबत.

महोदय,

चंद्रपूर जिल्ह्यात खरीप हंगामातील धान पिकावर सध्या खोडकिडी तसेच करपा रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने अनेक भागांतील शेतकऱ्यांच्या उभ्या धान पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या किडी व रोगाचा प्रादुर्भाव वेळीच नियंत्रित न केल्यास धानाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या आर्थिक खर्चातून धानाचे पीक उभे केले आहे. मात्र ऐन हंगामात खोडकिडी व करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे या परिस्थितीत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा देणे अत्यंत आवश्यक आहे.

तरी, आपण चंद्रपूर जिल्हाधिकारी तसेच संबंधित कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना देऊन खोडकिडी व करपा रोगामुळे नुकसान झालेल्या धान पिकाची गावनिहाय प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत. पंचनाम्याच्या आधारे नुकसानग्रस्त क्षेत्र निश्चित करून पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या प्रचलित निकषांनुसार आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करण्यात यावेत.

तसेच पुढील नुकसान टाळण्यासाठी कृषी विभागामार्फत खोडकिडीच्या नियंत्रणासाठी आवश्यक कीटकनाशके व करपा रोगाच्या नियंत्रणासाठी आवश्यक बुरशीनाशके मोफत उपलब्ध करून देण्यात यावीत. कृषी विभागाच्या पथकांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी करून शेतकऱ्यांना औषधांचा योग्य वापर, फवारणीचे प्रमाण व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करावे.



Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

धानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटण्यापूर्वीच प्रभावी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास वाचविण्यासाठी शासनाने ही बाब अत्यंत गांभीर्याने घेऊन तातडीने कार्यवाही करावी.

तरी आपण संबंधित यंत्रणांना खालीलप्रमाणे तात्काळ निर्देश द्यावेतइ

१. खोडकिडी व करपा रोगामुळे झालेल्या धान पिकाच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्यात यावेत.

२. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात यावी.

३. खोडकिडी व करपा रोगाच्या नियंत्रणासाठी आवश्यक कीटकनाशक व बुरशीनाशक औषधे मोफत उपलब्ध करून देण्यात यावीत.

४. कृषी विभागामार्फत गावनिहाय पाहणी व तांत्रिक मार्गदर्शन करण्यात यावे.

५. धान पिकाचे पुढील नुकसान टाळण्यासाठी युद्धपातळीवर आवश्यक उपाययोजना राबविण्यात याव्यात.

चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा हा अत्यंत महत्त्वाचा विषय असून, आपल्या स्तरावरून तातडीने निर्देश दिल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळू शकतो.

तरी, सदर बाबीची तातडीने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देण्यात यावेत, ही नम्र विनंती.

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रतिलिपी,
१. मा. जिल्हा कृषी अधिक्षक, कृषी अधिकारी, चंद्रपूर
२. श्री. बंडू गौरकर, सदस्य महाराष्ट्र राज्य कृषी मुल्य आयोग, मुंबई
मो.नं. ९१४५४०५६६७
३. श्री. रवी चहारे, जिल्हा अध्यक्ष, भाजपा किसान मोर्चा, चंद्रपूर महानगर
४. श्री. चंदु मारगोनवार, भाजपा तालुका अध्यक्ष, मुल, जि. चंद्रपूर
५. श्री. पिंटू देऊळकर, भाजपा तालुका अध्यक्ष, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
६. श्री. हरि ढवस, भाजपा तालुका अध्यक्ष, पोंभुर्णा, जि. चंद्रपूर
७. श्री. श्रीनिवास जंगम, भाजपा तालुका अध्यक्ष, चंद्रपूर, जि. चंद्रपूर



Scanned with OKEN Scanner